# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U/146 / 2008 / 67/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Chavan Haribhau Shankarrao, Plot No.C-5, CTS No.4646, Kasliwal Push, Near Mewad Lodge, Nageshwarwadi, Aurangabad.(Consumer No. 490011714191)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Chavan Haribhau Shankarrao, Plot No.C-5, CTS No.4646, Kasliwal Push, Near Mewad Lodge, Nageshwarwadi Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 24.10.2008 at 16.00 Hrs.**

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL.Aurangabad.**

**Encl As above**.

Copy to :

Shri Chavan Haribhau Shankarrao,
Plot No.C-5, CTS No.4646,
Kasliwal Push, Near Mewad Lodge,
**Nageshwarwadi.**
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४६/२००८/६७**

**तक्रार दाखल दिनांक ;- २१/१०/२००८**
**निकाल दिनांक ;- १४/११/२००८**

**श्री हरिभाऊ शंकरराव चव्हाण,**
**माला क्र. सी.५, कासलीवाल,मेवाड लॉज जवळ,**
**नागेश्वरवाडी, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११७४११९१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/१०/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनी कडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्यांना मार्च २००६ पर्यंत त्यांना वीज वापरानुसार वीज बिल देण्यात येत होते ज्याचा भरणा त्यांनी नियमीतपणे केलेला आहे. एप्रिल २००६ व त्यापुढील काळात त्यांना महावितरण कंपनीकडुन चुकीची वीज बिले आकारणी करण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना देण्यात आलेल्या या चुकीच्या वीज बिलाची तक्रार त्यांनी अनेकवेळा महावितरणच्या संबंधीत विभागाकडे केली पण त्याची दखल न घेण्यात आल्याने त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीला सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे. अर्जदाराने त्यांना देण्यात येत असलेल्या चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करू नये असा अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करू नये याबाबत अंतरिम आदेश पारीत करण्याबाबत केलेल्या अर्जदार दिनांक २४/१०/२००६ रोजी सुनावणी घेण्यात आली. अजदार श्री चव्हाण तसेच महावतिरणचे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी याबाबतची कागदपत्रे संबंधीत विभागाकडुन प्राप्त न झाल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. मंचाने अर्जदाराने दाखल केलेल्या कागदप़त्राची पाहणी केल्यावर महावितरण कंपनीकडुन वीज बिल आकारण्यात चुकी झाल्याचे प्राथमिक पाहणीवरून मंचास आढळुन आले. मंचाने त्यामुळे अर्जदाराचा तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्यांचा विज पुरवठा खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश पारीत केला या प्रकरणाची पुढील तारीख ०४/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०४/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या

जवाबानुसार अर्जदाराचा सरासरी वीज वापर हा ९० युनिट एवढा असुन त्यास एप्रिल २००८ ते सप्टेबर २००८ या काळात २३० युनिट सरासरीवर आधारीत वीज बिल त्यास आकारण्यात आले जे चुकीचे असल्याचे मान्य करीत ते कमी करून देण्याची तयारी त्यांनी दर्शवीली आहे.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी राखुन ठेवले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, अर्जदार हे महावितरण कंपनीचे ग्राहक असुन त्यांनी घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. फेब्रुवारी २००८ पर्यत त्यांना मीटर रिडींग प्रमाणे वीज बिल आकारण्यात आल्याचे दिसुन येते मार्च २००८ ते सप्टेबर २००८ या काळात त्यांच्या मीटरवरील रिडींगची नोंद चुकीची घेतली गेल्यामुळे सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाने दिनांक ०१/११/२००८ रोजी केलेल्या स्थळ पाहणी अहवालात मीटरवरील रिडींग ही २८४८ तसेच मीटर सुस्थितीत असल्याचे स्पष्ट होते. यावरून मार्च २००८ ते ०१/११/२००८ या काळात अर्जदाराचा एकुण वीज वापर (२८४८-१९४६)९०२ असा असल्याचे आढळुन येते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे वीज बिल रिव्हीजन करतांना घेतलेला एप्रिल २००८ हा महीना चुकीचा असुन तो मार्च २००८ धरण्यात यावा असे मंचाचे मत आहे.

वरील बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास मार्च २००८ ते ०१/११/२००८ या काळाचे ९०२ युनिट वीज वापराचे सुधारीत बिल ३० दिवसात द्यावे.

२) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देतांना त्यात कोणतेही व्याज व दंड लावु नये.

३) वरील काळात अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची सुधारीत वीज बिलात वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया**<br>**सदस्य** | **आ. नि. सोनवणे**<br>**सदस्य/सचिव** | **विष्णु अं. हंबिरे**<br>**अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४६/२००८/६७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री हरिभाऊ शंकरराव चव्हाण,**
**माला क्र. सी.५, कासलीवाल,मेवाड लॉज जवळ,**
**नागेश्वरवाडी, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११७४११९१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१४६/२००८/६७ )

आपण दिनांक २१/१०/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**